नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ११/१०/२०२४ (शुक्रवार)**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणा—या आरोपीविरूध्द कारवाई

पोलीस स्टेशन उमरेड :— पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत दि.१०/१०/२४ रोजी दुपारी १२/१५ वा.ते १३/३० वा. दरम्यान उमरेड पोलीस हददीत पेट्रोलींग करत असतांना एक पिवळया रंगाचा टीप्पर क्र. एमएच ४०ए.के ५९७० हा अवैधरित्या रेतीची वाहतुक करतांना मिळुन आला. पोलीसांनी सदर टिप्परला थांबवले टिप्पर मध्ये असलेले १. कृष्णा हिराचंद महाजन वय ३३ वर्षे रा नवेगाव पालेपार त. पवनी जि. भंडारा २. आशिष नरसीह श्रिरामे वय २७ वर्षे रा. भिवापूर जि. नागपूर यांना विचारपुस केली आणि टिप्परची तपासणी केली टिप्पर मध्ये ६ ब्रास रेती मिळुन आली. त्यांना रेतीच्या रॉयल्टी बाबत विचारणा केली असात त्यांनी रॉयल्टी नसल्याचे सांगितले.तसेच सदर रेती यूवराज यशवंत जूनघरे रा. उमरेड (टिप्पर मालक )याच्या सांगण्यावरून भरून नेत आहोत असे सांगितले.त्यामुळे **पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन टीप्पर क्र. एमएच ४०ए. के ५९७०किं. अंदाजे २०,००,०००/— रू. आणी टिप्पर मधिल ६ ब्रास रेती प्रत्येकी ५०००/— रू. प्रमाणे किं. ३०,०००/— रू. असा एकून २०,३०,०००/— रूपयाचा मुददेमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला आहे.**

**आरोपी नामे १.कृष्णा हिराचंद महाजन वय ३३ वर्श रा नवेगाव पालेपार त. पवनी भंडारा २. आशिष नरसीह श्रिरामे वय २७ वर्श रा. भिवापूर जि. नागपूर,३.पाहीजे आरोपी यूवराज यशवंत जूनघरे रा. उमरेड** यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन उमरेड येथे कलम ४९,३०३(२),३ (५) बीएन.एस सह.कलम ४८ (७),४८ (८) म.ज.म.सं १९६६ स.क.४,२१ खाण खनिज अधि सह.क ३ सा.स.नू.प्रतिबंध अधि सह.क.१५ पर्यावरण संरक्षण अधि.स.क. १३०,१,१७७ म.मो.वा.का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास सपोनि अतुल रामटेके ,पोस्टे उमरेड हे करीत आहेत.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण,मा. श्रीमती वृष्टी जैन,उपविभागिय पोलीस अधिकारी,उमरेड विभाग तथा सहा. पोलीस अधिक्षक पोलीस निरीक्षक श्री धनाजी जडक यांच्या मार्गदर्शनाखाली सहा पोलीस निरीक्षक कुणाल रामटेके आणि पोना प्रकाश जावरकर यांनी पार पाडली.

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणा—या आरोपीविरूध्द कारवाई

पोलीस स्टेशन कुही :— पोलीस स्टेशन कुही अंतर्गत १०/१०/२४ चे १७/०० वा .दरम्यान कुही पोलीस पेट्रोलींग करत असतांना मौजा सिल्ली ते उमरेड कडे जाणारा रस्त्यावर एक स्वराज कंपनीचा लाल—पांढरा रंगाचा ट्रक्टर मुंडा क्रं. एम एच.४०सी ए ०२६८आणि विनाक्रमांकाची ट्रॉली मध्ये रेतीची वाहतुक करीत असतांना मिळुन आली. ट्रॅक्टर चालक क्रिष्णा शालीक साखरकर, वय ३० वर्ष काळेश्वर मंदीर जवळ कुही ता. कुही जि. नागपूर याला थांबवुन विचारपुस केली असता त्याला रेतीच्या रॉयल्टी बाबत विचारणा केली असात त्याने रॉयल्टी नसल्याचे सांगितले.तसेच सदर ट्रक्टर हा ) रोशन प्रल्हाद धनजोडे वय ३३ वर्ष रा. मांढळ चौक कुही याचा मालकीचा असुन त्याच्याच सांगण्यावरून रेती चोरून नेत आहो असे सांगितले.त्यामुळे पोलीसांनी पंचासमक्ष **आरोपीच्या ताब्यातुन स्वराज कंपनीचा लाल—पांढरा रंगाचा ट्रक्टर मुंडा क्रं. एम एच.४०सी ए ०२६८ किंमत ४,००,००० रू. व ट्रॉली विना क्रमांकाची किंमत १,००,००० रू. व ट्रालीमध्ये असलेली अंदाजे एक ब्रास रेती किं. ४००० रू. असा एकुण ५,०४,००० रू. चा मुद्देमाल मुददेमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला आहे.**

आरोपी नामे आरोपी क्रिष्णा शालीक साखरकर, वय ३० वर्ष काळेश्वर मंदीर जवळ कुही ता. कुही जि. नागपूर २) रोशन प्रल्हाद धनजोडे वय ३३ वर्ष रा. मांढळ चौक कुही(फरारी)यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन कुही पोलीस स्टेशन येथे कलम ३०३(२),४९ भा न्या सं २०२३, सह.कलम ४८(७)(८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनीयम—१९६६, सह.कल.४,२१ खाणी खणीजे अधिनीयम १९५७, सह. कलम ३ सार्वजनीक संपत्ती नुकसान प्रतीबंध अधिनीयम १९८४, मोटार वाहन कायदा—१९८८ कलम ५०/१७७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण,मा. श्रीमती वृष्टी जैन,उपविभागिय पोलीस अधिकारी,उमरेड विभाग तथा सहा. पोलीस अधिक्षक कुही पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक श्री भानुदास पिदुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील गोपाले, पोलीस हवलदार ओमप्रकाश रेहपाडे, पोलीस नाईक गोकुल सलामे, पोलीस अंमलदार राहुल देवीकर ,अनिल कारचखेडे यांनी पार पाडली.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर